# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२१/२०२५ दिनांक- १६/०१/२०२५

## प्रेस नोट

**अनधिकृतरित्या नालासोपारा पोलीस ठाणे हद्दित वास्तव्यास असलेल्या एका महीला बांग्लादेशी नागरीकांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-नालासोपारा पथकाची कारवाई.**

दिनांक १६/०१/२०२५ रोजी अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना बातमीदारामार्फत विरार पोलीस ठाणे हद्दीतील नित्यानंतद नगर, कोपरी गाव, विरार पुर्व, ता.वसई, जि.पालघर या ठिकाणी बांगलादेशी नागरीक विनापरवाना राहत असल्याची माहिती मिळाली.

बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह नित्यानंतद नगर, कोपरी गाव, विरार पुर्व, ता.वसई, जि.पालघर या ठिकाणी सापळा रचुन १) तोहीद अब्दुल शेख, वय १९ रा. रुम नं. सी/०२, श्री नित्यानंद अमृत बिल्डींग, नित्यानंद नगर कोपरी गाव, विरार पुर्व, ता.वसई. मुळ रा. मु.नवाखली, पो.राश्तमथा, छंदबाद, जि.छंदबाद, बांग्लादेश. २) आलम सलेमान मंडळ, वय ३८ वर्षे, रा. रुम नं. २०, आर.के. जिवदानी दर्शन अपार्टमेंट, कोपरी तलाव जवळ, कोपरी गाव, विरार पुर्व, ता.वसई, मुळ रा. मु.आमतोइल, पो.पुरोलीया, ता.कालीयान, जि.नोराईल, बांग्लादेश. ३) श्रीमती रुमा उस्मान शेख, वय ३५ वर्षे, रा.रुम नं. सी/०१, नित्यानंद गुरुकृपा बिल्डींग, नित्यानंद नगर, कोपरी गाव, विरार पुर्व, ता.वसई मुळ रा. ग्रा.इस्लामपुर, पो.ठाणा तेराखादा, जि.खुलना, बांग्लादेश. या बांग्लादेशी नागरीकांना ताब्यात घेवुन दुभाषीकामार्फत चौकशी केली असता, ते भारतात कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्राशिवाय किंवा भारत सरकारने अथवा भारतीय सिमेवरील नोंदणी अधिकाऱ्यांनी नेमुन दिलेल्या मार्गाव्यतिरीक्त घुसखोरीच्या मार्गाने भारतीय सरहद्दीत प्रवेश केल्याचे सांगून १) तोहीद शेख याने तो अंदाजे ६ महीन्यांपासून २) आलम मंडळ याने तो अंदाजे २ वर्षापासून ३) श्रीमती रुमा शेख हिने ती अंदाजे ७ वर्षापासून भारतात राहत असून सध्या वर नमुद पत्त्यावर अवैधरित्या वास्तव्य असल्याचे कबुल केल्याने तसा सविस्तर पंचनामा करुन त्यांना ताब्यात घेवुन सदर इसमांच्याविरुध्द सरकारतर्फे फिर्याद दिल्याने विरार पोलीस ठाणे गु.रजि.नं. २३/२०२५ भारतीय पासपोर्ट अधिनियम १९५० चे कलम ३(अ), ६(अ), सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उपआयुक्त श्री.अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा चे पोनि/सौरभी पवार, मपोहवा/साक्षी डोईफोडे, पोहवा/रोशन किणी, पोहवा/महेंद्र शेटये, पोहवा/अमित चव्हाण, मपोशि/काजल पाटील, पोहवा/सुनिल पागी, सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा यांनी उत्कृष्टरित्या केली आहे.

------oooo------